# प्रकरण पहिले

## कादंबरीचे विशेष आणि प्रादेशिक कादंबरी

## प्रकरण पहिले

## कादंबरीचे विशेष आणि प्रादेशिक कादंबरी

### १) प्रस्तावना:

मराठीतील ख्यातनाम कथालेखक व्यंकटेश माडगूळकर यांची "बनगरवाडी" ही कादंबरी ख-या अर्थाने मराठीतील पहिली प्रादेशिक कादंबरी आहे. आधीच्या प्रादेशिक कादंबऱ्याहून या कादंबरीचे रूप वेगळे असल्याचे सकृद्दर्शनी जाणवते. माडगूळकरांच्या या कादंबरीत रूढ कथानक आढळून येत नाही. व्यक्तिचित्रणातही वेगळेपणा आढळतो. तसेच या कादंबरीत रूढ पध्दतीचा नायक दिसत नाही. निवेदन पध्दतीतही वेगळेपणा आहे. या कादंबरीचा हा जो वेगळेपणा आहे. तो कोणत्या स्वरूपाचा आहे ? त्याची वैशिष्टये प्रादेशिकतेत कितपत आहेत ? हे प्रस्तुत लघुप्रबंधात पहावयाचे आहे.

प्रादेशिकतेच्या अस्सल चित्रणामुळे कादंबरीच्या रूपात फरक पडतो काय ? या शोधाबरोबरच "बनगरवाडी" या कादंबरीच्या रूप वैशिष्टयांचाही अभ्यास करणे येथे अभिप्रेत आहे. तो करताना कादंबरी या वाङ्मय प्रकाराची वैशिष्टये, कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा उगम, वाटचाल व विस्तार या दृष्टीने थोडक्यात ओळख करुन घेऊन, प्रादेशिक कादंबरीचा विचार थोडया विस्ताराने करु. "बनगरवाडी" ही प्रादेशिक कादंबरी असल्याने प्रादेशिक कादंबरीची वैशिष्टये पाहिल्याखेरीज तिचे विशेषत्व लक्षात येणार नाही. म्हणून या पहिल्या प्रकरणात कादंबरीचे विशेष आणि प्रादेशिक कादंबरी यांचा विचार करावयाचा आहे.

### २) कादंबरीचा उगम:

मराठी कादंबरीच्या संदर्भात प्र.वा. बापट, ना.वा. गोडबोले, ना.सी. फडके, डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर यांची मते लक्षात घेतली तर कादंबरी या

शब्दाबाबत, कादंबरी या प्रकाराबद्दल विविध मते दिसून येतात. "कादंबरी हा शब्द आपला असला, पण कल्पनापरकीय म्हणावी लागेल"[१] असे प्र.वा. बापट ना.वा. गोडबोले म्हणतात. तर ना.सी. फडके म्हणतात "मराठी साहित्याचा इतिहास जेमतेम सत्तर वर्षांचा आहे". तर डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर लिहितात- "तसे पाहिले तर कादंबरी हा वाङ्मय प्रकारच इतका सर्वसमावेशक आहे की, त्याला व्याख्येच्या चौकटीत पकडणे किंवा कादंबरी या नामाभिधाने अंगुलिनिर्देश करण्यात आलेल्या सर्व कादंबऱ्यांचे व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट करणे आजही कठीण होवून बसले आहे"[3] परंतु भालचंद्र नेमाडे म्हणतात, ही विधाने खरी असली तरी ती ज्या अर्थाने वापरली जातात तो अर्थ मराठी समीक्षेत दिशाभूल करणारा झाला आहे. कादंबरीचे स्वरूप केवळ इंग्रजी नाही. तिचा उगमही इंग्रजीत नाही. ह्या साहित्यप्रकाराचे मूळ शोधता शोधता डिकॅमेरन्, बॅंडेलो, पंचतंत्र... असे देशोदेशी हिंडावे लागते... साहित्य प्रकार हे देशकालातीत असतात तितकेच देशकालनिष्ठही असतात, हे भान ठेवावे लागते. हे भान ठेवलेतर कादंबरी हा साहित्य प्रकार जरी इंग्रजीवरून आला तरी एक रचना प्रकार म्हणून तो हिंदूस्थानात तरी नवा नाही. हे लक्षात घेतले पाहिजे."[४] सारांश, कादंबरी या वाङ्मय प्रकाराबद्दल मतऐक्य नसल्याने कादंबरी या शब्दाबाबत, तिच्या स्वरूपाबाबत साहजिकच भिन्नता दिसून येते.

एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी असे म्हणण्याचा प्रघात बऱ्याच आधीपासून रूढ आहे. कादंबरी या शब्दाचा अर्थ आसव, मद्य असा आहे. व हे मद्य जसे प्रत्यक्षाचा विसर पाडणारे, चित्तवृत्ती उल्हासित करणारे असते तसे काहीसे कादंबरीचे स्वरूप असते. इंग्रजीत 'Novel' तिला म्हणतात त्यावरून तिच्या नवलपूर्ण स्वरूपाची कल्पना येते. कधी 'fiction' हा शब्दही कादंबरीच्या संदर्भात वापरला जातो व त्यावरून कादंबरीच्या कल्पित व नवनिर्मित स्वरूपाची

कल्पना येते. हिंदीत कादंबरीला "उपन्यास" म्हणतात. व 'उपन्यास' याचा अर्थ जवळ ठेवणे अथवा समोर मांडणे. कादंबरीत मानवी जीवनपुढे मांडलेले असते. एवढेच नव्हे तर बाणभट्टाच्या गद्य आणि कल्पित ग्रंथाचे नाव "कादंबरी" आहे तेव्हा कादंबरीचे मूळ कल्पित गोष्टीत आहे. अशा या वाङ्.मयप्रकाराबद्दल विविध लोकांनी तिच्या व्याख्या करुन तिचे स्वरुप ठरविण्याचा प्रयत्न केला. परंतु डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर म्हणतात की, "कादंबरी हा इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्व समावेशक वाङ्.मय प्रकार आहे की त्याचे स्वरुप सांगता आले तरी व्यवच्छेदक लक्षणांनी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे."[५] तरी सुध्दा काही व्याख्या पाहूनच कादंबरीचे स्वरुप ठरविता येईल.

## ३) कादंबरीची व्याख्या व स्वरुप:

वरील विवेचनावरुन गद्यात लिहिलेली काल्पनिक गोष्ट अशी कादंबरीची व्याख्या करता येईल. परंतु काही पुढील व्याख्या पहाता येतील.

"सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करुन काल्पनिक पात्रांची स्वभाव चित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्टी स्थाने वर्णन करुन कलानंदाची प्राप्ती करवून, जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य-वाङ्.मय विभाग"[६]

-- बापट गोडबोले.

"कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य-कथा म्हणाजे कादंबरी"[७]

-- श्री.मा. कुलकर्णी

"एखाद्या व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिध्दीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणाजे कादंबरी."[८]

-- ना.सी. फडके.

वरील व्याख्यावरून कादंबरी हा कथावाङ्मयाचाच भाग असून ती गद्यात लिहिलेली ललित गद्य कथा होय, कुठल्याही विषयावर कादंबरी लिहिली तरी अखेर ते मानवी जीवनाचेच चित्रण असते व हे मानवी जीवन जेवढया विस्तृत प्रमाणात, सखोल दर्शन घडविणारे असेल तेवढी ती कादंबरी श्रेष्ठ ठरते.

मानवी जीवन आणि भोवताल यांच्यात सतत संघर्ष चालू असतो. जीवन हे संघर्षमय असल्याने जगण्यासाठी मानवाला सतत धडपड करावी लागते, संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष व्यक्ती-व्यक्तीचा, व्यक्ती-समाज, व्यक्ती-निसर्ग, अशा स्वरूपाचा असतो. म्हणजेच मानवी जीवनाला अनेक पदर असल्यामुळेच भालचंद्र नेमाडे कादंबरीची व्याख्या करताना लिहितात. "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेकपदर असलेली, त्यामुळे विस्तृत सरंचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत, अशी साहित्यकृती असते."[१]

म्हणूनच कादंबरीत सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह मांडलेला असतो. तसेच पोटसमूह पोटसंस्कृती यांचेही तपशीलवार दर्शन असते. आशयसूत्रे बळकट असतात. संपूर्ण काळ व समाजाचा छेद घेतलेला असतो. मानवी संघर्षाचे दोन भाग पडतात. एक व्यक्तीचे आंतरिक जीवन, तर दुसऱ्या प्रकारात सभोवतालचे बाह्य जीवन. पहिल्यात व्यक्तीच्या मानसिक हालचालीचा अंतर्भाव होतो, तर दुसऱ्यात त्याच्या कृतीचा परिणाम याचा समावेश होतो. म्हणजेच कादंबरीत व्यक्ती व घटनांनी बनलेले कथानक असते व लेखक हरघडी घडणाऱ्या घटनांतून विशिष्ट घटनांचीच निवड करतो. जीवनदर्शनाच्या हेतूने या घटना कोणात्यातरी स्थळी, कोणात्या तरी काळी घडू शकतील अशा असतात. अशा प्रकारचे कादंबरीचे सर्वसामान्य स्वरूप असते.

परंतु कादंबरीचे खरे स्वरूप कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली या घटकांनी बनलेले असते. म्हणून या घटकांचा थोडक्यात परिचय करून घेणे ओघानेच येते. त्याशिवाय कादंबरीच्या रूपाचे पूर्ण चित्र डोळ्यापुढे उभेच राहू शकत नाही.

४) कादंबरीचे घटक:

कादंबरीच्या कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली या चार घटकांचा क्रमशः विचार करु.

अ)कथानक:

कादंबरीच्या घटकात विषय अथवाकथाबीज असते. कादंबरीची कल्पना कशातून तरी स्फुरलेली असते. हे "काहीतरी" म्हणजेच कादंबरीचा विषय होय. कथानकाला एक किंवा अनेक आशयसूत्रे असतात. याची दखल पूर्वीच्याकादंबरीकारानी घेतलेली दिसत नाही. तसेच केवळ नायक-नायिका यांच्या भोवती फिरणारे कथानक, समाजातील विविध स्तरातील लोकांची दखल सुध्दा या कादंबरीकारांना नव्हती. हरिभाऊ सोडले तर बहुतेक लेखक कथानक, उपकथानक यातच अडकून पडले याचे कारण प्रा. ना.सी. फडके यांनी आपल्या "प्रतिभासाधन" या ग्रंथात कथानकाविषयी काही आदर्श घालून दिले. उदा. कथानक बांधेसूद, उत्कंठावर्धक, विस्मयदर्शक पाहिजे. त्यामुळे फडके-खांडेकर यांच्या कादंबरीतील कथानके खोटी, नक्ली वाटू लागली व या दोघा कादं बरीकारांचाच कित्ता पुढील लेखक पिढीने दीर्घकाळ गिरविला. ज्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर हे कथानक घडते तो निसर्गही फक्त प्रणयाच्या रंगासाठी वा पानपुरकासाठी येऊ लागला. त्यामुळे कथानके परिणामशून्य बनली. त्यात जीवनाचे चढउतार नाहीत की, जीवनदर्शनही नाही. परंतु शरच्चंद्र चतर्जींची "श्रीकान्त" व हरिभाऊ आपटयांची "पण लक्षात कोण घेतो ?" या कादंबऱ्या कथानकाच्या दृष्टीने लक्षणीय ठरल्या.

दुसरे असे की, कथानकातील परिणामकारकता, संभवनीयता, तर्कशुध्दता व मौलिकता वाढवायची असेल तर कादंबरीच्या विषयाला अनेक आशयसूत्रे असतील तर ते कथानक जीवनाच्या विविध अंगांना स्पर्शून जाते. कथानकाएवढाच महत्त्वाचा घटक म्हणजे व्यक्तिचित्रण. याचा विचार आपण थोडक्यात करु.

## ब) व्यक्तिचित्रण:

मनुष्याला जसे शरीर असते तसे मनही असते मनुष्याच्या बाहयांगामध्ये शरीराची ठेवण, वर्ण, वेषभूषा, केशभूषा, चालण्याबोलण्याच्या लकबी, सवयी यांचा अंतर्भाव होतो. अंतरंगात मनाची संवेदनशीलता, रागविराग, आशा-आकांक्षा, श्रध्दा, दया, करुणा, विश्वास इ. भावभावनांचा, विकारांचा, विचारांचा समावेश होतो. अंतरंगातील भावभावनांच्या खळबळींचा परिणाम शरीरावर होतो. उदा. राग आल्यास डोळे वटारणे, दात ओठ खाणे, मुठी वळणे, शरीर थरथरणे, चेहरा लालबुंद होणे. अशा क्रिया घडतात. कादंबरीकार आपल्या कल्पनेतल्या पात्रांना अशी स्वभाववैशिष्ट्ये देतो. त्यामुळे काही पात्रे सरळ मनोवृत्तीची, अपरिवर्तनशील असतात. इंग्रजीत त्यांना flat charácter म्हणतात. तर काही परिवर्तनशील असतात त्यांना Round character असे म्हणतात. *दुर्दैवाने ही पात्रे जिवंत होण्यासाठी त्यांच्या तोंडची भाषा या कादंबरीकारांना जमली नाही. कारण नायक-नायिकेच्या तोंडी नागरभाषा व सेवकांच्या तोंडी मुद्दाम कृत्रिम केलेली ग्रामीण भाषा, त्यामुळे ही पात्रे खोटी व नक्ली बनली व ती कथानकाशी एकजीव झालीच नाहीत. म्हणूनच का. बा. मराठे यांनी १८७२ मध्ये लिहिलेल्या "नावल" व "नाटक" या निबंधात म्हटले आहे की, "सांप्रत जी नावले निघत आहेत त्यात जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, जेवढया स्त्रिया तेवढया तिलोत्तमा, प्रत्येक शोकस्थळी मरणासारखा शोक व

आनंदस्थळी स्वर्गासारखा आनंद, दुसरी उपमाच नाही."[१०] अशी व्यक्ति-चित्रणाबाबतची स्थिती होती. आपल्या कादंबरीतील नायक-नायिका सर्वगुण-संपन्न असल्याच पाहिजेत असा जणू संकेतच ठरुन गेला होता. त्यामुळे फडके--खांडेकर यांच्या कादंबरीतील नायक-नायिका आदर्शवादीच बनल्या. पुढील पिढीतही हाच प्रकार दिसतो अगदी पेंडसे-दिघे यांच्या कादंबरीतील नायक-नायिका दिवास्वप्नात रमणाऱ्या, प्रेमासाठीच जगणाऱ्या रेखाटलेल्या दिसतात. थोडक्यात खोटी व्यक्तिचित्रणेच मराठी कादंबरीत दीर्घकाळ रेखाटली गेली. यानंतर कथानक व व्यक्तिचित्रण यांच्या मानाने गौण स्थान असलेला घटक म्हणून ज्याचा उल्लेख लेखक करीत तो म्हणजे वातावरण. परंतु वातावरणाचे कादंबरी-तील स्थान गौण नाही. म्हणून त्याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

## क) वातावरण:

कादंबरीत वातावरणाला काही एक स्थान असते याची जाणीव प्रादेशिक कादंबरीच्या पूर्वकालातें लेखकांना असल्याचे दिसत नाही. केवळ नायक-नायिकांचा प्रणयाला उठाव आणण्यासाठीच निसर्ग वापरला गेला किंवा तो पार्श्वभूमी म्हणून आला. काही लेखकांनी तर तो पानपूरकासाठीच वापरला. वातावरणाचा परिणाम मानवी जीवनावर होतो याची जाणीवच या लेखकांना फारसी दिसत नाही. वास्तविक पहाता निसर्गाचा फार मोठा परिणाम, भोवतालच्या जगाचा फार मोठा परिणाम मानवी मनावर व जीवनावर पडतो याचे दर्शन या नागर कादंबऱ्यातून दिसत नाही. एवढेच नव्हे तर निसर्ग अंगचोरुनच त्यांच्या कादंबऱ्यातून डोकावतो. म्हणूनच बापट-गोडबोले लिहितात, "...काही अपवाद वगळता मराठी कादंबरीकारांनी इकडे म्हणावे तसे लक्ष न पुरविल्यामुळे सामान्यत: मराठी कादंबरीचे ठराविक छशाचे, पांढरपेशा वर्गाचे जीवन कमी अधिक प्रमाणात भडक-रंगात पार्श्वभूमी म्हणून रंगविलेले आढळते"[११] खांडेकरानी सुध्दा या पार्श्वभूमी बाबत

असे लिहिले की, "आमचे मराठी लेखक कसल्या गोष्टी लिहितात. त्यांचे ते पुण्या मुंबईचे बंगले, चहाचे पेले, श्रीमंतांचे मेळे, प्रणयाचे चाळे,सारेच काही निराळे."[१२] खांडेकरांनी आपल्या "उल्का" कादंबरीत पात्राद्वारे आपले मनोगत व्यक्त केले असले तरी खुद्द खांडेकर ज्या कोल्हापूर, सांगली, शिरोडा परिसरात वास्तव्य करून राहिले. तिथला निसर्ग, वातावरण त्यांच्या कादंब-यातून फारसे दिसून येत नाही हा विरोधाभास जाणवतो.

सारांश १९५० पर्यंतच्या नागरकादंब-यातील निसर्ग हा खिडकीतून पाहिलेला निसर्ग वाटतो. वातावरण निर्मिती साठी हे लेखक आपल्या नायक-नायिकेला घेऊन मलबार हिल, हिमालय अशा निसर्गरम्य कुशीत जात. ते ही कल्पनेनेच, कारण तोही निसर्ग खरावाटत नाही. म्हणजेच वातावरण या घटकाकडे म्हणावे तसे लक्ष प्रादेशिक कादंबरीपूर्व अवस्थेत दिसत नाही.

आता शेवटचा आणि महत्त्वाचा घटक म्हणजे भाषाशैली तिकडे वळू.

## ड) भाषाशैली:

कादंबरीच्या घटकांत भाषाशैलीला फार मोठे महत्त्व आहे. लेखकाचा जीवन विषयक दृष्टिकोण, विचारमूल्ये, मते यांचे दर्शन तो भाषाशैलीतून घडवीत असतो. भाषाशैली म्हणजे लेखकाच्या अंत:करणातील विचार-विकारांना, भाव-भावनांना, तसेच बौध्दिक व भावनात्मक अनुभवांना मिळालेले शाब्दरूप. परंतु दुर्दैवाने खरी मराठी भाषा या कादंब-यातून अभावानेच आढळते. नागर लेखकांनी संस्कृतप्रचूर मराठी भाषेचाच अधिक वापर केलेला दिसतो. मेनिअर विल्यम्सला एका जबाबदार मराठी गृहस्थाने असे सांगितल्याची नोंद आहे की, "महाराष्ट्रात चांगली मराठी लिहू शकेल असा माणूस नाही."[१३] असे नेमाडयांनी म्हटले आहे. वि.रा. शिंदे यांनी तर सारांश रूपाने सांगितले आहे की, "खरी मराठी भाषा ज्ञानेश्वरां-

पासून तुकारामापर्यंत होती, बिघडता बिघडता लोकहितवादी आणि जोतिबा-फुले ह्यांचेपर्यंत ही कशीबशी जीव धरून होती. पण चिपळूणाकर व आगरकरांनी तर तिचा गळाच चेपला. टिळकांनी, हरिभाऊ आपटयांनी तोंडात शेवटचे दोन घोट सोडले, पण ते शेवटचेच ठरले". [१४]

एकीकडे ब्राम्हो-आंग्ल संस्कार, हरदासी गद्य तर दुस-या बाजूने इंग्रजीचा प्रभाव यामुळे मराठी भाषा बिघडतच गेली. त्यामुळे खरी मराठीभाषा साहित्यात वंचितच राहिली. समाजातल्या विविध स्तरातील भाषांचा स्पर्शसुध्दा मराठी कादंबरीला झाला नाही. अर्थात त्यालाही कारण म्हणजे फडके, श्री.के. क्षीरसागर यांना प्रादेशिक भाषेतील लेखन मान्य नव्हते. परंतु व्यक्तिदर्शन अचूक आणि जिवंत करायचे असेल व जीवन चित्रण ज्या पध्दतीचे असेल त्या पध्दतीची भाषा वापरायला हवी. जे जीवन चित्रित करायचे तिथल्या लोकांची भाषा लेखकांने आत्मसात करायला हवी. तशी नागर कादंब-यातून दिसत नाही. प्रा. मा.ना. कागणे लिहितात, ".... साधी निरलंकृत शैली आशयाला, पात्र-प्रसंगाला आंदोलीत नेमकेपणाने नेते. संवादातून व्यक्तिमनाचे पदर उलगडत जातात. स्वभावावर लख्ख प्रकाश पडतो तेव्हा अधिक भाष्य करण्याची गरज उरत नाही." [१५] परंतु मराठी कादंबरीची भाषा अलंकृत, संस्कृत प्रचुरच राहिल्याने खरे जीवनदर्शन ती घडवू शकली नाही व सर्वसामान्य वाचकाला ती परकीय वाटू लागली. ती आपली भाषा वाटलीच नाही.

अशा प्रकारे कादंबरीच्या घटकावरून कादंबरीचे स्वरूप पाहिल्यावर मराठी कादंबरीच्या स्वरूपाविषयी थोडक्यात विचार करू.

५) मराठी कादंबरीचे स्वरूप व विकास:

मराठीतील पहिली कादंबरी म्हणून हरि केशवजी यांची "यात्रिक क्रमण"

ही कादंबरी असली तरी कादंबरीच्या व्यवच्छेदक लक्षणावरून हा मान बापट-गोडबोले, बाबा पद्मनजी यांच्या "यमुनापर्यटन" (१८५७) या कादंबरीला देतात. "मराठी कथा वाङ्.मय" या लेखात वि.का. राजवाडे व श्री.कृ. कोल्हटकर हा मान "मुक्तामाला"या कादंबरीला देतात. तर भालचंद्र नेमाडे म्हणतात की, "आशयसूत्रानुसार शैली भाषेच्या माध्यमातून विविध तंत्रांनी त्याची मांडणी करते, "यमुनापर्यटन"मध्ये अशी कृती दिसते."[१६]

वरील सर्व मतावरून "यमुनापर्यटन"लाच पहिली मराठी कादंबरी म्हणून मान दिला जातो या कादंबरीत महाराष्ट्रातील ब्राम्हण विधवांच्या शोचनीय अवस्थेचे अत्यंत ह्दयद्रावक वर्णन असून मराठीतील पहिली सामाजिक स्वतंत्र कादंबरी म्हणून या कादंबरीचे मूल्य अधिक आहे.

मराठी कादंबरीच्या विकासाच्या दृष्टीने भालचंद्र नेमाडे यांनी --

१) यमुनापर्यटन प्रवृत्ती
२) मुक्तामाला प्रवृत्ती
३) मोचनगड प्रवृत्ती

अशा तीन प्रवृत्ती मानल्या.

यमुनापर्यटन प्रवृत्तीमध्ये बाबा पद्मनजी-हरिभाऊ - वा.म. जोशी - सानेगुरुजी - विभावरी शिरुरकर - भाऊ पाध्ये - अनंत कदम - दीनानाथ मनोहर इ. लेखक येतात या लेखकांनी तत्कालीन सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. उदा. बालविवाह, विधवा समस्या, सनातनी प्रवृत्ती, व्यवहारवाद, पुनर्विवाह्ति व त्यांची संतती उदात्तवृत्तीचे ध्येयवेडे त्यागी देशसेवक या विषयांचीच हाताळणी केली. ध्येयवादाचा प्रचार, मध्यम पांढरपेशा वर्गाची

सुखदु:खे , स्त्रीशिक्षण, व स्वातंत्र्य याच विषयावर प्रामाणिकपणे लेखन केलेले दिसते.

'मुक्तामाला' प्रवृत्तीत रंजक आकृतिनिष्ठ पंडितीवळण, व वास्तवाच्या आधारे अ-वास्तव शोधून रीतिप्रधान कादंबऱ्या लिहिलेल्या दिसतात. मात्र कृती टाळलेली दिसते ही प्रवृत्ती हळबे - रिसबूड - जोरवेकर इ.- फडके - खांडेकर - माडखोलकर - भावे - पु.शि. रेगे - खानोलकर - रंगनाथ देशपांडे -माधव कानिटकर, काकोडकर - योगिनी जोगळेकर - कुसुम अभ्यंकर, (इ) चंद्रकांत खोत-बाब कदम इ.

या प्रवृत्तीच्या कादंबऱ्यातून जीवनाऐवजी वाङ्मयीन संकेतावर भर, अतिशयोक्ती, कृत्रिम अलंकृती, स्वभावदर्शनाचा अभाव, क्लिष्ट, पंडितीवळणाची भाषा, वास्तवापासून दूर, अद्‌भुत रम्यता रेखाटणाऱ्या, योगायोगावर भर असलेल्या अतिरंजित दिसतात. मात्र या प्रवृत्तीने वाचक वर्गाला वाचनाची आवड निर्माण केली व कादंबरीचा वेगळा स्वतंत्र संसार थाटण्याचा यत्न केला. एवढीच जमेची बाजू दिसते.

तर 'मोचनगड' प्रवृत्तीमध्ये वास्तवाचा आभास निर्माण करणारी वृत्ती दिसते याच प्रवृत्तीचे लेखन -गुंजीकर - हरिभाऊ - चिं.वि. वैद्य - नाथमाधव - हडप - रणजित देसाई - वि.स. खांडेकर (ययाति) - मनमोहन नातू - ना. सं. इनामदार शिवाजी सावंत - गो.नी. दांडेकर - अनाळकर - धारप - सिनकर इ. लेखकांनी केले

या परंपरेत इतिहासाविषयीचे प्रेम, बखरलेखन, काही ऐतिहासिक कादंबऱ्यांची भाषांतरे, इ. लेखन झाले. या ऐतिहासिक कादंबऱ्यांतून प्रत्ययकारी चित्रण झालेले दिसत नाही. ऐतिहासिक काळ, कल्पिताची मदत, व ऐतिहासिक सत्याशी इमान

राखण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. इतिहासाचे तुटपुंजे ज्ञान त्यामुळे बराच भाग कल्पितच वाटतो. मात्र ऐतिहासिक कादंबऱ्यांचा एक पायंडा या प्रवृत्तीने पाडलेला दिसतो.

या तिन्ही प्रवृत्तींचा साकल्याने विचार करून पुढील कालखंडातील कादंबऱ्यांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या हया माणसाच्या चांगुलपणावर उदंड, अदम्य श्रध्दा ठेवणाऱ्या परिस्थितीवादी आहेत. त्या पतितांचा धिक्कार करीत नाहीत तर उध्दाराचा उपाय शोधत राहतात. तर वा. म. जोशी सत्य, सौजन्य व सौंदर्य या सुमंगल तत्त्वत्रयीला त्यांच्या कादंबऱ्यात स्थान देतात. तात्त्विक कादंबऱ्याचे जनक म्हणूनच त्यांची ख्याती झाली. तर ना.सी. फडके यांची "कलेसाठी कला" ही भूमिका असल्यामुळे तत्त्वदर्शनाला त्यांनी विरोध केला. खांडेकरांनी "जीवनासाठी कला" या भूमिकेचा पाठपुरावा करून आदर्शगांधीवादी नायक निर्माण केले. तर फडक्यांनी रोमँटिक नायक-नायिकांचे उदंड पीक मराठी वाङ्मयात निर्माण केले. दोघांच्याही कादंबऱ्या स्वप्नरंजनवादीच होत्या. म्हणूनच भालचंद्र नेमाडे म्हणतात--"मराठी कादंबरीतील व्यक्तिवादी लैंगिकतेचे स्तोम, संतति-निर्मितीचे विहित धर्मकृत्य पारंपरिक निष्ठेने पार पाडणाऱ्या सद्गृहस्थांच्या हया समाजात व्यक्तिवादाच्या इंग्रजी कल्पना घुसल्याबरोबर स्त्री-पुरुष संबंधाच्या नग्न स्वातंत्र्यमूल्यांना अपरिमित बहर आला. प्रेमाची कल्पनाच मूल्य बनली. प्रेमाचा अगणित पध्दतींनी बहुरूपी आविष्कार झाला. कादंबरीत "मुक्तामाला" पासून खांडेकर, फडके, माडखोलकर, गाडगीळ, भावे, रेगे, जोगळेकर असे आजपर्यंत हया रोमँटिक प्रेमाने थैमान घातले. हया लाटेत पु.य. देशपांडेसारखे उपजत कल्पकता असलेले लेखकही सापडले होते, हयाचे आश्चर्य वाटता कामा नये."[१७] यावरून वास्तववादाचे मोठ्या प्रमाणात

विकृतीकरण झाले होते. कादंबरीच्या आकृतीच्या केवळ गरजेनुसार ठरुन, कादंबरीत प्रेमाला पोषक अशी वातावरण निर्मिती करताना, औद्योगिक शहरे, उच्च वर्ग, कॉलेज, खेळाची मैदाने, बंगले, नोकर-गाडया या गोष्टी आपोआप येऊन "प्रेम" म्हणजे विवाहपूर्व लैंगिकता असा अर्थ मराठी मनात रुजू लागला. मात्र सामाजिक आशयद्रव्य प्रगट होताना कुठेही दिसत नाही. आपला बहुसंख्य समाज खेडयापाडयांतून, आदिवासी भागात राहात आहे याची जाणीव या शहरी लेखकांना अजिबात नव्हती. खेडयातील समाज ज्ञानापासून वंचित, शेती व्यवसाय करीत, नागरी सुधारणा वा संस्कार यापासून कैक योजने दूर राहिला आहे त्यांची सुख-दु:खे मांडण्याचा प्रयत्न या लेखकांनी केला नाही. त्यांच्या लेखणीला हे "विश्व" पारखेच राहिले.

१९३५ ते ४० च्या दरम्यान मराठी कादंबरीने एक नवा उन्मेष पाहिला तो म्हणजे "प्रादेशिक कादंबरी" हा होय. र.वा. दिघे यांच्या "पाणकळा", "सराई", "पडरेपाण्या" कादंबऱ्या प्रादेशिकतेची ओळख करुन देणाऱ्या ठरल्या. शहरी लोकांना ग्रामजीवनाचे दर्शन या कादंबऱ्यांनी घडविले. परंतु र.वा. दिघे यांच्या या कादंबऱ्यांतूनही रोमँटिक मनोवृत्ती व कल्पनारम्यता यांचे मिश्रण असल्यामुळे प्रादेशिकतेतील वाघेपणा दिघे गमावूनच बसले.

तर श्री.ना. पेंडसे यांनी "एल्गार", "हद्दपार", "गारंबीचा बापू", "यशोदा","हत्या", "कलंदर" या कादंबऱ्या लिहून कोकणाचा परिसर उभा करण्याचा प्रयत्न केला.

तरे गो.नी. दांडेकर यांच्या "शितू", पडघवली" कादंबरीतून प्रेमाची कहाणीच सांगितली गेली फक्त तिला पार्श्वभूमी कोकणाची लाभली. दांडेकरांची

भूमिका जीवनवादाकडे झुकणारी होती. जुनी मूल्ये, ग्रामसंस्था, टासळत चालली म्हणून ते हळहळतात.

सारांश, १९५०-५५ पर्यंत रोमँटिक कादंबरीचे लोण प्रादेशिक कादंबरीत पोहचले. मात्र श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यातून सामाजिक आशयद्रव्य डोकावत दिसू लागले.

अशा प्रकारे प्रादेशिक कादंबरीचा उदय झाला. या प्रादेशिक कादंबरी-पैकीच "बनगरवाडी" ही कादंबरी असल्याने प्रथम प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप ठरवून मगच "बनगरवाडी"चे कोणते वेगळेपण आहे ते पहाता येईल.

## ६) प्रादेशिक कादंबरीची वैशिष्टयपूर्णता:

अ) प्रादेशिक शब्दाचे विवेचन: प्रादेशिक कादंबरीची वैशिष्टये पहाताना प्रादेशिक या शब्दाची कल्पना स्पष्ट करणे भाग आहे. प्रादेशिक या शब्दात "प्रदेश" हा जो शब्द आहे त्याचा अर्थ मराठी भाषेत एक प्रांत किंवा विशिष्ट भू भाग असा होतो. हा प्रदेश एका तालुक्याइतका संकुचित अथवा महाराष्ट्राइतका विस्तृतही कल्पिता येईल. महाराष्ट्राचा भू भाग, स्थान वैशिष्टये, चालीरीती, समजूती इ. दृष्टीने विभिन्न अशा लहान मोठया प्रादेशिक खंडांनी व्यापलेला आहे. प्रदेश या शब्दाची व्याख्या डॉ. मदन कुलकर्णी पुढील प्रमाणे करतात. "प्रदेश म्हणजे विशिष्ट भू-भागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक होय".[१८] काही लोक प्रदेश म्हणजे राज्यशासनाच्या सोयीसाठी पाडलेला एक भूभाग असाही अर्थ घेतात. किंवा विशिष्ट भौगोलिक वातावरणाने योजित असा पृथ्वीचा एक मोठा भूखंड.

या सर्व व्याख्या भूगोल, राज्यशास्त्राच्यादृष्टीने केलेल्या आहेत. मात्र साहित्याधारे "प्रदेश" शब्दाची व्याख्या केलेली उपलब्ध नाही. "साहित्यातील

प्रदेश सामाजिक व सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला एक घटक आहे" असे अ.रा. तोरो म्हणतात.[१९] थोडक्यात विशिष्ट भू-भागावरील, विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक असे प्रदेश" या शब्दाचे वर्णन करता येईल.

यानंतर प्रादेशिक या शब्दाकडे वळता येईल. कारण प्रादेशिक कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण प्रादेशिक या शब्दानेच केले जाते. प्रादेशिकतेबद्दल विविध मतमतांतरे आहेत. प्राचीन काळापासून मनुष्य आपल्या प्रदेशाशी निकटत्वाने बांधलेला असतो. प्रदेशाच्या अतिसंपर्काने त्याच्या मनात आपल्या प्रदेशाविषयी जिव्हाळा, प्रेम, निर्माण होते हा प्रदेश एकाहून दुसरा भिन्न असतो. या प्रदेशाची वैशिष्टये पहाताना नैसर्गिक वैशिष्टये, जीवनपध्दती, कुटुंबसंस्था, जाती पाती, समाजरचना, मनोवृत्ती, बोली या सर्वांचा अभ्यास त्यामध्ये अभिप्रेत असतो.

नैसर्गिकदृष्टया हा प्रदेश यंत्रदूर असतो. नागरसंस्कृतीहून अलिप्त. डोंगर, दऱ्या, झाडी, सागर, नदी, नाले, ओहळ, यांच्या आसपास वसलेली खेडी ही प्रादेशिक या व्याख्येत मोडतात. या प्रदेशातून जातपर जीवन असते. भारत हा देश खेडयांचा आहे. खरी भारतीय संस्कृती या खेडयातच पहायला मिळते. ही खेडी तिथल्या भूप्रदेशाच्या तालावर जगत असतात. झाडीमुळे जंगली जनावरे, पक्षी, अतिवृष्टी, अनावृष्टी, महापूर यांना तोंड देत मानवाला जगावे लागते. अल्पभूभागातच शेती असल्याने वर्षभर तिथल्या शेतकऱ्याला काबाडकष्ट उपसावे लागतात. तो काटक असतो. म्हणूनच निसर्गाशी चार हात करत जगत असतो. कधी लाकूड तोड, कधी मासेमारी, मध गोळा करणे, तर कधी शेती असे विविध धंदे त्याला आपापल्या भू प्रदेशानुरूप करावे लागतात. हा निसर्ग तेथील लोका-

करिता देवही असतो आणि मित्रही असतो. तर एका बाजूने तो श्रध्देचे कारण ठरतो तर दुस-या बाजूने भयाचे कारण ही ठरतो. इथले जीवन घड्याळाच्या काटयावर चालत नसून सूर्याच्या तालावर चालते. हे जीवन फक्त सुगीतच धावपळीचे असते एरवी ते संथ असते. इथला माणूस सतत निसर्गाला भित असल्याने तो निसर्गाची पूजा बांधतो, उत्सव करतो व निसर्गाला खुष ठेवण्याचा प्रयत्न करतो.

## ब) ग्रामरचना व ग्रामजीवन:

ग्रामीण समाज हा एकत्र कुटुंब पध्दतीचा असतो. विभक्त कुटुंब पध्दती सामान्यत: तिथे नसते. कुटुंबातील अनेक माणसे एकमेकांच्या मर्यादा सांभाळून राहतात तसेच वरिष्ठ लोकांचा - आजा, आजी, वडील यांचा कुटुंबातील लहान थोरावर वचक, अधिकार असतो त्यामुळे गुण्यागोविंदाने सर्वांना वागावे लागते. येणा-या संकटाला व सुखाला हे सर्व कुटुंब सामोरे जाते. ग्रामीण भागात भावकी असा एक प्रकार असतो. अशा अनेक भावक्यांचे मिळून एक खेडे बनते. या भावकींच्या गल्ल्या असतात. उदा. पाटील भावकी, जाधव भावकी, मोरे भावकी इ. त्याशिवाय इतर ब्राम्हण, साळी, माळी, अल्पसंख्याक कुटुंबेही गावाच्या गल्लीच्या शेवटी असतात. अस्पृश्यता पाळली जाते परंतु व्यवहारात ती पाळली जात नाही. उदा. महार, मांगांना ते स्पर्श करत नाहीत व त्यांना घरातही प्रवेश देत नाहीत व देवळातही प्रवेश देतनाहीत. परंतु त्यांनी केलेले दोरखंड, नाडे, मोटा, चपला यांचा स्पर्शमात्र चालतो. हा व्यवहार बलुतेदार पध्दतीने चालतो. शेतकरी सुगीच्या काळात आपले धान्य त्यांनी दिलेल्या वस्तूंच्यामोबदल्यात महार, मांग, न्हावी, सुतार, शिंपी यांना घालतो व वर्षभर त्यांच्याकडून वस्तू घेतो. अशी ग्रामरचना व ग्रामव्यवस्था असून त्यात्या ग्रामजीवनात या पाटील ते बलुतेदार-पर्यंतच्या लोकांना मानपान असतात. सर्वात मोठा मान पाटलाचा. बेंदराच्या सणात मान महाराला. त्याने आंब्याचे तोरण घराला आणून बांधले पाहिजे.

मोळीच्याकाडया आणून दिल्या पाहिजेत तसेच वर्षभर मयताचे सांगावे सांगणे मेलेली जनावरे ओढणे, झाडलोट करणे हे त्याचे काम. शिवाय वर्षभर पुरतील अशी दोरखंडे त्याने पुरविली पाहिजेत. मांगाची हालगी बेंदराच्या सणात, मयताच्या तेराव्याला वाजलीच पाहिजे. गावची दौंडी मांगाने दिली पाहिजे. चांभाराने वर्षभर मोट, नाडा, चपला, सापती, चाबुक, बाशिंगे, कातडयाची दिली पाहिजेत. न्हाव्याने वर्षभर केश कापणे. त्याचा मान लग्न कार्यात असतो. जावळ समारंभात ही त्याचा मान असतो. त्याला कधीकधी पोषाख करावा लागतो. गावात एखादी सासुरवाशीन आलीतर तिच्या "बुती" चा लाडू, सजोरी, करंजी गावाला वाटण्याचे काम त्याला करावे लागते. हे वाटणे का ? तर गावात अमक्याची सून आली, लेक आली याची सर्व गावाला कल्पना यावी हाच हेतू असतो. सुताराने वर्षभर औजारे पुरविणे, दुरूस्त करणे. त्याचा मान पेरणीच्यावेळी असतो. त्याने कुरी (पाभरी) जुंपल्याखेरील शेतकरी पेरणी करत नाही. अशावेळी तो पाभरीला फुलांचा हार घालतो. व चाडया- तून धान्य सोडतो. त्यावेळी पाभरीची परीक्षाच घेतली जाते व अनायसे त्याला पायलीभर धान्यही मिळते. कासाराने काकणे (कंकण) घालणे. त्याचा मान लग्न कार्याला असतो. जवळ जवळ सर्वच बलुतेदार लग्न, जावळ, समारंभात आपापल्या मानापानासाठी जमतात. सणावाराला सण मागतात. गावाशी सलोखा ठेवून असतात. अशी ही बलुतेदार मंडळी गावगाडयाला जुंपलेली असतात.

गावाच्या मध्यभागी चावडी, एखाद्या स्थानिक देवाचे, देवीचे मंदिर असते. विशेषत: म्हसोबा, भैरोबा, जोतिबा, नाईकबा, मरीआई, जुगाई, (जोगाई) इ. देवतांची ही मंदिरे असतात. या देवळात पूजा अर्चासाठी एक गुरव असतो. तोही बलुतेदार पध्दतीनेच काम करतो. शिवाय पिठ मागणे, नैवेद्य घेणे यावर

तो चरितार्थ चालवितो. देवदेवतांच्या पुढील दक्षिणा तो घेतो. शिवाय साकडं घालणे, कौल लावणे, पूजाअर्चा इ. कामे तो करतो, या देव, देवतांची वर्षातून चैत्र-वैशाख या महिन्यात यात्रा भरते. तमाशे, सोंगी भजणे, इत्यादीतून ते आपली करमणूक करुन घेतात. अंधश्रध्दा, रीतिरिवाज पाळतात. उदा. कोंबडे, बकरे देवाला कापणे, लिंबू, उतारा टाकणे, अंगारा-धुपारा करणे, मान-पान करणे, एकमेकाला मदत करणे इ. गोष्टी पाळल्या जातात. गावात लेझीम ढोल यांचा वापरही करमणूक म्हणून सायंकाळी केला जातो. पारावर, चावडीवर सुतारमेटावर गप्पांचे अड्डे चालतात. गावच्या कुचाळक्या केल्या जातात. नदीची ओटी भरणे, सागराला पूजणे, नावेला पूजणे, जनावरांची पूजा करणे, इ. विविध पूजांचे प्रकार हे श्रध्दाळू मनाने केले जातात. शेती हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य विभाग असल्याने ती वैध वा अवैध मार्गाने बळकाविण्याचे प्रयत्न होतात. सर्वापेक्षा जास्त पिक आपल्या शेतीत निघावे यासाठी ईर्षा निर्माण होते व शेतकरी त्यासाठी जिवलावून शेती करतो. भांगलण, कापणी, मळणी, यांत एकमेकाना साहय केले जाते. गावातल्या कुणाच्याही मुलाला कोणीही वठणीवर आणू शकतो. समळा गाव पाटलाला मानीत असतो. अशा प्रकारचे जनजीवन खेडयात चालते.

क) ग्रामीण मनोवृत्ती:

या लोकांच्या मनोवृत्तीही पहाण्यासारख्या आहेत. पाटलाचे गावाने ऐकलेच पाहिजे. पाटलाचा शब्द म्हणजे प्रमाण. त्याच्या शब्दाबाहेर गाव नसतो. गावच्या पोरीबाळींची अब्रू ही सगळया गावाची अब्रू असते तिला अधिक महत्त्व असल्याने डोळयात तेल घालून ती जपण्याचा प्रयत्न सारा गाव करतो या अब्रुवर कुणी घाला घालणारा निघाला तर त्याचा खून करण्यासही मागे पुढे

पहात नाहीत. गावातील कुणाचीही लेक नांदायला निघाली तर सारा गाव वेशीपर्यंत निरोप द्यायला जातो. गावात कुणी वारले, जन्मले तर त्याचे सुतक भावकी १० दिवस पाळते पण सारा गाव तीन दिवस तरी पाळतोच. गावातील कुणी आजारी पडला, सर्पदंश झाला, हातपाय मोडले तर सारा गाव गोळा होतो. विचारपूस होते, मदत केली जाते. हे जसे आहे तसेच एका भावकीचे दुस-या भावकीशी वैरही असते. हे वैर पिढयानुपिढया चाललेले असते. त्यात खून खराबा होतो. शेतीचे दावे, कोर्ट कचे-या यात इर्षेपाई शेतकरी बुडत असतो. कर्जकाढून सण व मुलीचे लग्न करताना त्याला काहीही वाटत नाही. मोठया "डिंबात" लग्न करण्याची व मोठेपणा मिळविण्याची हौस प्रत्येकाच्या मनात असते. लग्नकार्यात, घरचे काम म्हणून सारा गाव राबतो. मदत करतो मग ही मदत आर्थिक वा धान्यरूपाचीही असते. सण उत्सव असताना एखाद्याच्या घरात मयत झाल्यास त्याच्या घरात सण पोहचविला जातो. गावातल्या गावात भांडणे असली तरी गावावर संकट आले की मात्र सारा गाव एक होतो व प्राणाची बाजी लावतो. गावातील सामुदायिक कार्यात सर्वजण राबत असतात. आपल्या गावची शान वाढविण्यासाठी पैलवानकी, बैलगाडयांच्या शर्यती लावल्या जातात. अशावेळी गावाचे नाक उंच करणारा पैलवान मग सा-या गावाचा होतो. सारा गाव त्याला पोसतो. गावगाडयाच्या विरुध्द वागणा-याला मात्र "वाळीत" टाकले जाते. त्याची मदत तोडली जाते. भावकीत त्याला घेत नाहीत. त्याच्या कार्यात कुणी उभे राहत नाही. एखाद्याने पीक कापले, चोरी केली तर दंड केला जातो. गावचे पंच, पाटील देईल तो निर्णय गावाला मान्य करावा लागतो. गावातील बडया लोकांची "अंगवस्त्रे" असतात त्यांनाही पत्नी इतकाच मान असतो. पण एखादी वाईट चालीची बाई निघाली तर तिला शासन करताना लोकांना काहीही वाटत नाही. वर्षातून येणारे सण, उत्सव यांना अधिक महत्त्व

असल्याने परगावी गेलेले लोक, नांदायला गेलेल्या लेकी-बाळी आपल्या ग्राम-देवतेला नैवद्य-नारळ देण्यासाठी न चुकता हजर राहतात. व वर्षाचे आरोग्य--धन-संपदा देवाजवळ मागतात. जनावरांनाही माणसा इतकेच महत्त्व असल्याने शेतकरी त्यांची जीवापाड जपणूक करतो. एखादा बैल मेला तर घरातले माणूस मेल्याइतकेच त्याला दु:ख होते. त्याचे दफनही मोठ्या इतमामाने केले जाते. तसेच गावातल्या इतरापेक्षा आपल्याकडे काही चांगली जनावरे आहेत याचा अभिमान तो बाळगत असतो.

मात्र कधी कधी शेतीच्या बांधावरुन, पाटाच्या पाण्यावरुन, शेतात शिरलेल्या जनावरावरुन, चोरीवरुन मारामारी होते. कोर्ट-कचे-या होतात. अशा वेळी माघार घेणे कमीपणाचे मानले जाते व इर्षेपायी कधी कधी जमिन सावकाराकडे गहाण टाकली जाते व त्याच्या कर्जात शेतकरी बुडत जातो.

३) प्रादेशिक बोली:

प्रादेशिकतेचे खरे वेगळेपण जाणवते ते बोली मुळे. स्थानिक भाषा व बोली यांना प्रादेशिकतेत फार महत्त्व असते. वास्तवता व वातावरण निर्मिती या दोन कारणासाठी प्रादेशिक कादंब-यातून बोली-भाषेचा उपयोग केला जातो. निवेदन व संवाद या साठी बोली वापरली जाते व फक्त संवादासाठीही बोली वापरली जाते. निवेदन नागरी भाषेत असते. व्याकरण दृष्टया ही भाषा अशुध्द, रानवट, वाटली तरी भाषेची मूळरुपे या बोलीतच सापडतात. या बोलीतील शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, समूहगीते, जात्यावरील गीते यातून प्रादेशिकतेचे चित्र उभे करण्याचे सामर्थ्य असते. तिच्या रांगडेपणामुळेच ती शहरी लोकांना आवडू लागली आहे. या बोलीतील एका एका शब्दापाठीमागे केवढा

मोठा सामाजिक संदर्भ, आशय उभा असतो. बोली बोलताना सभ्य-असभ्य असा प्रकार ग्रामीण भागात नसतो त्यामुळे जे काही बोलू ते स्पष्ट व रोखठोक, विनासंकोच असते.

प्रादेशिकतेची ही वैशिष्टये अल्पस्वल्प प्रमाणात संस्कृत नाटकातील काही विशिष्ट पात्रांच्या बोलीत., संतांच्या अभंगवाणीत, लावणी वाङ्.मयात दिसतात. यानंतर या प्रादेशिक कादंबरीच्या व्याख्याच पाहू.

## ७) प्रादेशिक कादंबरीची व्याख्या व वैशिष्टये:

प्रादेशिक कादंबरीची व्याख्या ना.सी. फडके, प्रा. बापट-गोडबोले, प्रा. एस्.एस्. भोसले, डॉ. भाऊ मांडवकर, प्रा. आनंद यादव इ. लोकांनी केलेली आहे.

प्रा.ना.सी. फडके म्हणतात, "कादंबरीकाराने भौगोलिक परिचित प्रदेश, वातावरणाची पार्श्वभूमी म्हणून वापरलेला असावा आणि त्याचा ठसा उमटावा म्हणून त्याचे बारकाईने वर्णन करावे. तसेच प्रादेशिक कादंबरीने अज्ञात वन्य जाती-जमातीचे जीवन-चित्रण करावे असे वाटते."[१९]

डॉ. भाऊ मांडवकर म्हणतात, "एखाद्या विशिष्ट भूभागाचे वास्तव व वेगळे चित्रण करण्यात येऊ लागल्याने अशा चित्रणाच्या लिखाणाला "प्रादेशिक" हे नाव सर्रास रूढ झाले. .....आदिवासी, दलित, उपेक्षित व विशिष्ट भू-भागाचे ठसे उमटविणा-या कादंब-या तयार होताच ग्रामीण कादंबरी प्रादेशिक ठरली."[२०]

डॉ. आनंद यादव म्हणतात, "प्रादेशिक वाङ्.मयात त्या त्या प्रदेशातील ग्राम विभागाचे समूह दर्शन अभिप्रेत असते, आणि ग्रामीण वाङ्.मयात त्या त्या ग्राम विभागातील व्यक्तिनिष्ठ जीवन अभिप्रेत असते."[२१] परंतु

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रा. मधु कुलकर्णी व गो.म. कुलकर्णी म्हणातात, त्याप्रमाणे ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कथा कादंब-या असा शब्दप्रयोग न करता सर्व ग्राम-विषयक साहित्याचा समावेश "प्रादेशिक" या संज्ञेत करावा व हे मत मान्य करण्यासारखेच आहे. थोडक्यात विशिष्ट भू भागाचे वास्तव चित्रण करणारी कादंबरी म्हणाजे प्रादेशिक कादंबरी असे म्हणाता येईल. यानंतर प्रादेशिक कादंबरीची वैशिष्ट्ये थोडक्यात पाहू.

१९४० मध्ये र.वा. दिघे यांनी "पाणाकळा" नावाची कादंबरी लिहून प्रादेशिक कादंबरीची सुरुवात केली व प्रादेशिक कादंबरीला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी "सराई" (१९४३) 'आई आहे शेतात' (१९५७), 'पड्रे पाण्या' (१९५८) या कादंब-या लिहिल्या. श्री.ना. पेंडसे यांनी 'हद्दपार' (१९५०), गारंबीचा बापू (१९५१), हत्या (१९५४), रथचक्र (१९६२) या कादं-ब-या लिहिल्या. गो.नी. दांडेकरांनी "शितू" (१९५२), "पवनाकाळचा धोंडी" (१९५४), "पूर्णा-मायेची लेकरं" (१९५६), "पडघवली" (१९५७), "माचीवरला बुधा"(१९५८) इ. कादंब-या लिहिल्या तर बा.भ. बोरकर यांनी १९५० मध्ये "भावीण" कादंबरी लिहिली. ग.ल. ठोकळ यांनी "गावगुंड" (१९४७) कादंबरी लिहिली. अशा प्रकारे मराठी प्रादेशिक कादंबरीच्या क्षेत्रात विपुल लेखन केले जाऊ लागले.

मराठी प्रादेशिक कादंबरीत र.वा. दिघे, श्री.ना. पेंडसे यांनी उत्तर कोकणाचा निसर्ग आपल्या कथा-कादंब-यातून रेखाटला त्यामानाने त्यांच्या कादंब-यातून राजापूर, सावंतवाडी, मालवण वगैरे दक्षिण कोकणाचे चित्रण फारसे नाही. चंद्रकांत काकोडकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या लेखनातला गोमंतक मद्य-मैथुनाच्या चित्रांनीच रंगलेला आहे. दिघे-पेंडसे यांच्या कादंब-या

दिवास्वप्नांच्या रंजक स्पातच दिसतात. ठोकळांची "गावगुंड" तर रंजक प्रधानच आहे. बोरकरांची "भावीण" देवदासी, भोग, विलास यावरच लक्ष केंद्रित करून लिहिलेली आहे. कोकणाच्या परिसरावर लिहिलेल्या बहुतेक कादंब-यांतून देवदासी, भोग हेच विषय दिसतात.

सामाजिक वास्तवाचे भान, चिंतनशीलता, जीवनाकडे बघण्याचा निश्चित दृष्टिकोण इ. गुण फारसे आढळून येत नाहीत.

ज्या प्रदेशावर या कादंब-या लिहिल्या गेल्या त्या प्रदेशाचा मानवी जीवनावर जो एक परिणाम होतो त्याचे फारसे चित्रण या कादंब-यातून दिसत नाही. डॉ. मदन कुलकर्णी यांनी सांगितलेले प्रादेशिकतेचे घटक, भौगोलिकता, मागासलेपणा, यंत्रदूरता, निसर्ग लोकसंस्कृती, सामूहिकता व भाषा या घटकांच्याकडे फारसे लक्ष या लेखकांनी दिलेले नाही. माळरान, डोंगराळ भागातील दारिद्र्य, त्याचा वागण्यावर होणारा परिणाम, उदा. अशा भागातील माणसे वृत्तीने कंजूष, बनतात. तर सुबत्ता असणा-या भागातील माणसे उदार, चैनीबाज, दिसतात. हा त्या प्रदेशाचाच परिणाम असतो. तसेच प्रादेशिक कादंबरीत वास्तव जीवनाचे चित्रण असते व या वास्तव चित्रणामुळेच मुख्यत: प्रादेशिकतेचा ठसा उमटत असतो. हे वास्तव अनेक अंगी व अनेक गुणी असते. लौकिकालाही सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक असे अनेक पैलू असतात. या सर्वांच्या वास्तव चित्रणावर प्रादेशिकतेचा कमी अधिक प्रभाव अवलंबून असतो.

परंतु प्रादेशिक कादंबरीत हे अजून फारसे आलेले दिसत नाही. निसर्ग जेव्हा पात्र बनून येतो तेव्हा निसर्गाच्या आंदोलनावर प्रादेशिक जीवन आंदोलत असते. ते आपणास "बनगरवाडी"त दिसते.

सारांश, रंजकतेच्या आहारी प्रादेशिक कादंबरी गेल्यामुळे दिघे, पेंडसे,

बोरकर, कौरे लेखकांच्या कादंब-या गेल्यामुळे वास्तवाच्यापासून त्या दूर गेल्या अशा कालात "बनगरवाडी" कादंबरीने एक नवा कसा प्रादेशिक कादंबरीला दिला. प्रादेशिक कादंबरीचा मानदंड ठरावा अशी ही कादंबरी होय."[२२]

सारांश:
=======

मराठी कादंबरीची व्याख्या अनेक लोकांनी केल्या परंतु भालचंद्र नेमाडे यांची व्याख्या "कादंबरी म्हणजे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना सांभाळणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्य कृती असते" ही व्याख्या सूत्र म्हणून स्वीकारून मराठीच्या नागर व प्रादेशिक कादंब-यांची चर्चा केली. प्रादेशिक कादंबरी अवतरण्याच्या आधी पांढरपेशा लेखकांनी ना.सी. फडके-कृत घालून दिलेल्या नियमावर हुकूम लिहिलेली नागर कादंबरी होती. त्यामुळे जीवनाच्या वास्तवतेला स्पर्श न करताच ती कल्पना रम्य स्वरूपाची व मनोरंजन करण्याच्या हेतूने लिहिलेली असे तिचे स्वरूप होते ही कादंबरी कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, भाषाशैली या चार घटकावर आधारलेली दिसते या चार घटकांचा साकल्याने विचार करता असे दिसते की, कल्पनेने तयार केलेले, योगायोगावर आधारलेले कथानक यांचा ती आधार घेणारी होती.

त्यानंतर प्रादेशिक कादंबरीची वैशिष्टये पाहिली. तेव्हा असे दिसून येते की, प्रादेशिक या घटकाला प्रादेशिक कादंबरीकारांनी महत्व दिले असले तरी तिचे स्म नागर कादंबरीहून फारसे वेगळे दिसत नाही.

अशा प्रकारे "बनगरवाडी" आधीच्या कादंबरीचा विचार केल्यानंतर "बनगरवाडी" या कादंबरीला गुणवत्ता कोणकोणत्या वैशिष्टयामुळे प्राप्त झाली आहे याचा विचार पुढील प्रकरणात करू.

## संदर्भ


१. प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले - मराठी कादंबरी: तंत्र व विकास, आवृत्ती ३, पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७३, पृ. ३.

२. ना.सी. फडके - "मराठी कादंबरीची वाटचाल" परिसंवाद, पुणे, कुलकर्णी ग्रंथागार, १९७२.

३. डॉ.चंद्रकान्त बांदिवडेकर - "मराठी कादंबरीचा इतिहास" १९८९, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. ३,४.

४. भालचंद्र नेमाडे - "कादंबरी" परिसंवाद, "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५०-१९७५) संपादक. गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६-१९०७.

५. डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर- "मराठी कादंबरीचा इतिहास" १९८९, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ. ५,६.

६. प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले - "मराठी कादंबरीची वाटचाल" परिसंवाद, पुणे, कुलकर्णी ग्रंथागार, १९७२.

७. श्री.मा. कुलकर्णी, - "कादंबरीची रचना" पृ. १५, उन्मेष प्रकाशन, नागपूर.

८. ना.सी.फडके -"मराठी कादंबरीची वाटचाल" परिसंवाद, पुणे.

९. का.बा. मराठे - "नावल" व नाटक निबंध १८७२.

१०. प्र.वा. बापट व ना.वा. गोडबोले. - "मराठी कादंबरी: तंत्र व विकास", सु.आवृत्ती, पुणे, व्हीनस प्रकाशन, १९७३,पृ.९

११. वि.स. खांडेकर - "उल्का" पान नं ६४. देशमुख आणि कंपनी पुणे.

१२. भालचंद्र नेमाडे - "कादंबरी" परिसंवाद, "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५०-१९७५) संपा.गो.मा.पवार व म.द. हातकणंगलेकर. पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८६-१९०७, पृ. १९.

१३. तत्रैव - पृ. १९.

१४. प्रा. मा.ना. कागणे - "प्रतिष्ठान" कादंबरी समीक्षा विशेषांक जानेवारी, १९८१.

१५. भालचंद्र नेमाडे - "कादंबरी" परिसंवाद, "मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप" (१९५०-१९७५) संपा.गो.मा. पवार/ म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई

१६. तत्रैव - पृ. २५.

१७. डॉ. मदन कुलकर्णी - "मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, पृ. १६.

१८. तत्रैव - पृ. २७.


.....